
# श्री साई-गीत

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ...... काव्य ......
सं. क्र. २५८५



REFBK-0025789
REFBK-0025789

शिवाजी सावंत / राघव शिवणीकर

संदर्भ काव्य
२५८५
२५५८९
८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(कृ. मा. पहा)
२०००-१२-८८

प्रकाशन

संदर्भ काव्य
२५८५
२५७८९
२५७१२५१८८

# ॥ श्री साई-गीत

रचनाकार

शिवाजी सावंत ★ राघव शिवणीकर

REFBK-0025789
REFBK-0025789

श्री ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५८५
काव्य २५७८९
२५७१२५१८८
शाखा (स्थळ प्रत)

सुवर्ण
प्रकाशन

प्रकाशन क्र. ५१

प्रकाशक : सुरेश दिगंबर जोशी, सुवर्णा प्रकाशन
७९० सदाशिव पेठ, 'साईकृपा', पुणे–४११ ०३०

मुद्रक : सा. रा. भंडारी, भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ, पुणे ४११ ०३०

© शिवाजी सावंत / राघव शिवणीकर

मुखपृष्ठ : रविमुकुल

प्रकाशन : गणेश चतुर्थी, १५–९–१९८८

मूल्य : दहा रुपये

# श्री साई स्मरणापूर्वी चार शब्द

हे गीतात्मक 'श्री साईगीत' वाचकांचे हाती अत्यंत श्रद्धामय अंतःकरणाने देताना आम्हास निर्कोप व निरामय असा परमानंद होत आहे. संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ, सोहिरोबा, चोखोबा, नरहरी सोनार, बहिणाबाई आदी संतांनी अभंगरूपाने आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा भक्कम ठेवा महाराष्ट्रात अजरामर करून ठेवलेला आहे. तो वाचताना भक्तांना व अभ्यासूंना सात्विक समाधान मिळते, त्याची तुलना अन्य कशाशी होऊच शकत नाही.

महाराष्ट्रामध्ये तर आधुनिक काळातही अनेक साधुसंत होऊन गेलेले आहेत. शेगावचे गजानन महाराज, अक्कलकोटचे स्वामी समर्थ, सोलापूरचे परशराम महाराज, दानोलीचे साटमबुवा, पुसेसावळीचे कृष्णदेव महाराज, फलटणचे आबासाहेब, गोंदवल्याचे गोंदवलेकर महाराज, पावसचे स्वामी स्वरूपानंद महाराज, मायणीचे येसूबुवा, पलूसचे धोंडीबुवा, त्रिपूटीचे गोपाळनाथ महाराज व त्यांचे शिष्य हैबती महाराज, संभूराजू इत्यादी असंख्य संत, कवी व महात्मे होऊन गेले. त्या थोर व प्रातःस्मरणीय सत्पुरुषांमध्ये शिरडीचे 'श्रीसाईबाबा' हे सर्वमान्य संतशिरोमणी होऊन गेले. त्यापैकी कित्येकांनी तर स्वतःच पद्यरचना केली असून, ती भक्तवाचकांना आज उपलब्ध आहे.

अशा संतांपैकी काही साक्षात्कारी सिद्धपुरुष होऊन गेले आहेत व त्यांनी आपल्या भक्तांची दुःखे 'आपल्यावरील भक्तीभावामुळे' कमी केलेली असून, कित्येकांना साक्षात्कार घडविलेले आहेत. निरनिराळ्या भक्तांना आलेली प्रत्यक्ष 'अनुभूती' हाच त्यांचा प्रत्यक्ष पुरावा आहे. अनुभूती हीच या भक्तीच्या निरामय क्षेत्रात सर्वात मोलाची असते.

श्री साईबाबांनीही आपल्या असंख्य भक्तांच्या यातना कमी केल्या असून, त्यांना साक्षात्कार घडविलेले आहेत. भक्तांना प्रत्यक्ष अनुभूती आलेली असल्यामुळेच, श्रीसाई बाबांचे असंख्य भक्त देशभर सर्वत्र विखुरलेले असून ते बाबांवर अनन्यसाधारण भक्तीभावाने श्रद्धा ठेवीत आहेत. जीवनामध्ये कोठेतरी 'श्रद्धा' ही ठेवलीच पाहिजे. 'माता-पिता व गुरुजन' तसेच वडीलधारी मंडळी यांच्या शिकवणुकीवर श्रद्धा आणि भक्ती ही असलीच पाहिजे. 'भाव तेथे देव' असे जे म्हटले आहे, ते भावाच्या श्रेष्ठतेमुळेच !

आमचा अंधश्रद्धेवर मुळीच विश्वास नाही, किंबहुना अंधश्रद्धेवर कठोर आघात करण्यातच आमचे आजवरचे आयुष्य व्यतीत झाले आहे. आम्हास या चरित्रात समता, सर्वधर्म समभाव, मानवता व राष्ट्रीय एकात्मतेचा महान संदेश दिसून आला. म्हणूनच आम्ही तो काव्यरूपाने भक्तांच्या व अभ्यासकांच्या पुढे येथे नम्रपणे ठेवलेला आहे. श्रीसाईबाबांच्यावरील आमच्या आत्यंतिक व निर्लेप भक्तीमुळेच हा काव्यग्रंथ—

लिहिण्याचा आम्ही प्रपंच मांडला आहे. आम्हास श्रीसाईबाबांपासून स्फूर्ती मिळाली असून, काही ठोस प्रेरणाही मिळाली आहे. तसेच आमची अढळ श्रद्धा आहे की, श्री साईबाबांची जे भक्तीभावाने आराधना करतील, त्यांना श्रीबाबा चिंतामुक्त करून, त्या भक्तांचे ते सदैव पाठीराखे होतील; यात मुळीच शंका नाही ! ही बाब प्रत्येकाने आचरणात आणून ' अनुभूती 'ने जाणून घेण्याची आहे.

अद्यापपर्यंत श्री साईबाबांचे जीवनावर प्रकाशित झालेले सर्व ग्रंथ व उपलब्ध असलेले साहित्य अभ्यासून, आम्ही हा काव्यग्रंथ सिद्ध केला आहे. वाचक-भक्तांनी, अभ्यासकांनी व रसिकांनी या ग्रंथाचे मूल्यमापन करायचे आहे. आस्तिक आणि नास्तिक, सश्रद्ध व अश्रद्ध या अनादि वितंडवादात इथं कुणीही अकारण पडण्याचा कृपया प्रयत्न करू नये असे नम्रपणे सांगावेसे वाटते. ही रचना साईभक्तांनी एकांती गुणगुणण्यासाठी, प्रार्थना म्हणण्यासाठी आहे. किंबहुना यातील काही रचना साईपूजकांनी संघटित रूपात आळवाव्या अशा आहेत असे आम्हाला विश्वासपूर्वक वाटते. या रचनांचे धावते, सावध असे वाचनही समग्र अशा श्रीसाईनाथबाबा यांच्या अलौकिक चारित्र्याचा खात्रीलायक प्रत्यय देवून जाईल.

— तेवढे झाले तरी आम्ही रचनाकार या नात्याने भरून पावलो. येथे तेवढीच माफक अपेक्षा आहे.

— आता श्रीसाईनाथबाबा यांचेच निरपेक्ष, निकोप, मनोभावे व एकाग्र चित्ताने स्मरण करून, आम्ही कृतांजली जोडून - ' श्री साई-गीत ' हा श्रद्धाग्रंथ त्यांच्याच विमल व चक्रवर्ती चरणांवर इथं, त्यांच्या समाधी स्थली — मुक्काम शिर्डी — परिपूर्ण, सश्रद्ध अंतःकरणांनी अर्पण करतो !

जय श्री साईनाथ !<br>
शुभं भवतु !<br>
कर भला ! हो भला ! !

शिर्डी<br>
जि. अहमदनगर<br>
दिनांक : १५-९-८८

— कविद्वय —

**शिवाजी सावंत**<br>
विवेकानंद गृहरचना,<br>
फ्लॅट नं. ३, ' राधाकुंद ',<br>
पर्वती पुलानजीक, पुणे ३०.

**राघव शिवणीकर**<br>
( साहित्य-विशारद ),<br>
मु. पो. शिवणी, ता. खानापूर,<br>
जि. सांगली.

श्री साईनाथांचे काव्यमय चरित्र-दर्शन करण्यापूर्वी त्यांचे समाधीस्थल महाराष्ट्रात शिर्डी, जि. अहमदनगर ) आहे, महाराष्ट्राच्या पुण्यापावन भूमीचे प्रथम दर्शन घेऊ.

# महाराष्ट्र तीर्थक्षेत्र व साधुसंत दर्शन

चला जाऊ या कृष्णाकाठी । वाई क्षेत्राला
आधी नमू या घाटावरच्या । ढोल्या गणपतीला १
तुळजापुरी त्या आदीमाता । आई जगदंबेला
प्रतापगडच्या शिवरायांच्या । भवानी मातेला २
महाराष्ट्राच्या कुलदैवता । शंभू महादेवाला
तेल्या भुत्याची कावड पहाण्या । चला शिंगणापुराला ३
चला जाऊ या डोंगरमाथी । पाहू यात्रेला
गुलाल उधळुनी लाल करू या । देव जोतीबाला ४
चंद्रभागे तिरी पुंडलिक पाहू । जाऊ पंढरीला
डोळे भरुनी कृतार्थ होऊ । बघता सावळ्या विठ्ठला ५
सागरकाठी अष्टविनायका-या । वंदन करण्याला
पुळे गावच्या गणरायाला । नमन करण्याला ६
इंद्रायणीकाठी गजर चाले । पाहू समाधीला
ज्ञानेशांना वंदन करण्या । चला आळंदीला ७
टाळमृदंगी दिंड्या नाचती । देहू गावाला
वंदन करू या दंग भजनी । संत तुकोबाला ८
चला जाऊ या निवृत्तीनाथा । त्रिंबकेश्वराला
आणि जावू या सासवडनगरी । सोपानकाकाला ९
सावंता, चोखा, रोहिदास, गोरोबा । दामाजी पंताला
संत सखु आणि जनाबाई । नामदेवाला १०
सोहिरोबा आणि नरहरीच्या । चला दर्शनाला
संत सेना नी कान्होपात्रेला । वंदन करण्याला ११
चला जावू या नऊलाख त्या । गड जेजुरीला
पालीच्या त्या मल्हारीला । देव मार्तंडाला १२

कोल्हापूरची आई अंबाबाई । महालक्ष्मीला
दत्त दिगंबर दैवत आपुले । नरसोबा वाडीला १३
सिद्धरामेश्वराचे दर्शनाला । सोलापूर शहराला
अक्कलकोट स्वामी समर्था । वंदन करण्याला १४
बार्शी शहरी आपण जावू या । 'भगवंत' पहाण्याला
अर्धनारी नटेश्वराचे । रूप बघण्याला १५
चला जाऊ हुपरी गावी । आई अंबाईला
तसेच येऊ सांगवड्याच्या । देव नरसोबाला १६
विठ्ठल बिरदेवाच्या दर्शनाला । पट्टणकोडोलीला
पंचगंगेच्या स्नानासाठी । प्रयाग तिर्थाला १७
हिरण्यकेशीचा बघू धबधबा । आजरा गावी रामतीर्थाला
पाटगावच्या मठात जाऊ । मौनी बाबांच्या दर्शनाला १८
औदुंबर क्षेत्री चला जाऊ या । श्री दत्त दर्शनाला
संध्याकाळी आपण जाऊ । गाणगापुराला १९
भारुड, गवळणीच्या सम्राटाला । पैठण नगरीला
भागवतग्रंथी दंग जाहल्या । एकनाथाला २०
मराठवाड्यामधे आपण जाऊ । आंबेजोगाईला
औंढ्याच्या त्या नागनाथाला । परळी वैजनाथाला २१
विदर्भामधे शेगांवच्या । गजानन महाराजाला
माहूरच्या त्या रेणुकेला । चंद्रपूर नगराला २२
अजिंठा आणि वेरुळमधल्या । लेणी पहाण्याला
गौतम बुद्धाची लेणी पाहुनी । शांती आत्म्याला २३
जोगेश्वरी आणि मुंबादेवीचे । दर्शन घेण्याला
त्रिमूर्तींची लेणी पहाण्याला । चला घारापुरीला २४
कार्ल्याची ती लेणी पाहुनी । नमू एकवीराला
पार्वतीला वंदन करण्या । पुणे शहराला २५
सारसबागेमधे 'सिद्धविनायका' । वंदन करण्याला
चतुर्शृंगीचा थाट पाहू या । नवरात्र समयाला २६
चला जाऊ या भांबुर्ड्याला । जंगली महाराजाला
लेणी पहाता पाताळेश्वरची । शांती आत्म्याला २७

महाबळेश्वरहुनी तसेच पुढती । भिमाशंकराला
सोमनाथाचे दर्शन घेण्या । कारंजे गावाला २८
येवतेश्वराचे दर्शन घेण्या । चला सातार्‍याला
आणि जाऊ या खटाव गावी । पिंपळेश्वराला २९
कार्तिक स्वामींच्या दर्शनाला । चला नाझगिरीला
कृष्णामाईच्या स्नानासाठी । चला ब्रह्मपुरीला ३०
जरंडेश्वर, मार्च्छिद्र, नरसिंह । गोरखनाथाला
डोंगराई, आई, यमाई । रेवणनाथाला ३१
सागरेश्वर, कमळभैरी । आणि लिंगेश्वराला
डोंगरामध्ये तोंड लपविल्या । शुक्राचार्याला ३२
खरसुंडी सिद्धाच्या दर्शनाला । आणि घोडेखुराला
म्हसवड सिद्धाच्या रथावरती । गुलाल उधळण्याला ३३
परळी आणि चाफळ येथील । राम मंदिराला
रघुरायाचे दर्शन घेऊनी । सार्थक जन्माला ३४
ढेबेवाडीपुढे नाईकबाबाच्या । जाऊ यात्रेला
पुसे गावच्या सेवागिरीचा । रथ पहाण्याला ३५
कृष्णा--कोयना प्रीतिसंगम । कराड नगरीला
जुळेबंधु दोन मनोरे । वैभव शहराला ३६
चला जावू या थेट विट्याला । नाथ अष्टमीला
गगनी भिडल्या कडेगावच्या । उंच डोल्याला ३७
भंडार्‍यामध्ये देव खंडोबा । शिवणी गावाला
लाकडी कण्याचा गाडा निघाला । पाली यात्रेला ३८
चला जावू या पारे गावी । देव दरगोबाला
बिराळसिद्धाचे दर्शन घेण्या । कवठे एकंदाला ३९
गजाननाचा रथ पहाण्या । जाऊ तासगावाला
गोपुराची शोभा पाहुनी । तृप्ती आत्म्याला ४०
ब्रह्मपुरीपाशी माचणूरला । श्री सिद्धेश्वर देवाला
माणिकराय नि म्हालिंगराया । जावू हुलमयंतीला ४१
चला जावू या गोंदवल्याला । गोंदवले स्वामीला
आणि जावू या मायणी गावी । येसू बुवाला ४२

चला जावू या हिंगणगावी । नारायण स्वामीला
आणि जावू या वडगावी । जयराम स्वामीला ४३
नागेवाडीमध्ये नागमलसिद्धाच्या । जावू दर्शनाला
आणि जावू या पळूस गावी । धोंडी बुवाला ४४
वाल्मिकीहुनी तसेच पुढती । परशुरामाला
महाविराची मूर्ती पहाण्या । चला बाहुबलीला ४५
चला जावू या आजरा गावी । रामतीर्थाला
बांद्याच्या त्या सोहिरोबांना । सावंतवाडीला ४६
आणि नमू या, स्वरूपानंदा । पावस गावाला
परशुरामाची माता रेणुका । बसली सौंदत्तीला ४७
मिरासाहेबांचा दर्गा पहाण्या । मिरज गावाला
विशाळगडचे मलिकध्यान बाबा । चला पहाण्याला ४८
गोपाळनाथांच्या दर्शनाला । चला त्रिपूटीला
हैबतीबुवांची समाधी पहाण्या । जाऊ पुसेसावळीला ४९
संभूराजूचा डफ वाजतो । भिलवडी गावाला
नाथा मान्यांची समाधी पाहू । लेंगरे गावाला ५०
हाजीमलंगच्या दर्शनाला । जावू डोंगराला
सेंट मेरीचे चर्च पहाण्या । मुंबई शहराला ५१
शेवटी जावू गोदावरी काठी । प्रभू रामदर्शनाला
पंचवटीहुनी आपण जावू । त्रिंबकेश्वराला ५२
तिर्थक्षेत्री रंगता आपण । मुक्ती आत्म्याला
मोद मना जाहला । धन्यता वाटे कविद्वयांना ५३

□ □

" ॐ भुर्भुव: स्व: तत्सवितुर्वरेण्यम्
भर्गो देवस्य धीमहि
धियो योन: प्रचोद्‌यात ! "
ॐ शांती ऽ शांती ऽऽ शांती ऽऽऽ !

□ □

# ॥ श्री साईं-गीत ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य
शाखा (स्थळ प्रत)

## (नमन)

ॐ नमो, गौरीनंदना । करितो वंदना । धरितो चरणां ॥ ध्रु० ॥

द्यावी मती आम्हां, काव्य करण्या । साई बाबांचे चरित्र लिहिण्या १

गजवदना गणनायका । मोक्षदायका । विघ्न हारका

सद्गुरुचे चरित्र आम्ही गातो । नम्रभावे नमितो । धरितो चरणां २

□ □

## (साकी)

शिरडी गावी असे लागली । रांग कशी ही भक्तांची
साईबाबांची मूर्ती पाहता । होई शांतता जीवांची १

भक्त जनांची सोय मोठी ही । केली बघा इथे रहाण्याची
स्वस्तामध्ये सात्विक भोजन । तृप्ती केली हो आत्म्याची २

भावभक्तीची पेठ उघडली । साई कृपेच्या प्रेमाची
कविद्वयांना, आला अनुभव । आस आहे त्या चरणांची ३

# गीत पहिले

शिरडी ग्रामी होउनी गेले । श्री साईनाथ थोर
भक्तजनांच्या उद्धारास्तव । धरिला अवतार १
आठवता त्यां, उभे ठाकती । भक्ताच्या समोर
चराचरामध्ये भरुनी उरले । साई जगत्सार ! २
'सब का मालिक एक' असा हा । मंत्र दिला थोर
अवतारामध्ये अनंत केले । त्यांनी चमत्कार ! ३
दिली अनुभूती भक्त जनांना । झाले साक्षात्कार
पाहुनी डोळां, संतोषिले जन । महिमा अपरंपार ! ४
संकट वारी–बाबा साई । अंतर्ज्ञानी थोर
समोर दिसतां भक्त तयांचे । जाणती अंतर ! ५
भावमनीचा ओळखुनी त्या । देती उत्तर
बाबांनी ते कसे जाणले ? । वाटे चमत्कार ! ६
हेच गूढ हो साईनाथांचे । साई जगी थोर
अमृताचा कुंभ हाती । भरला भरपूर ७
हिंदु होते का ? मुसलमान ते ? । कोडे जनां फार
धर्मभेद हो कशास येथे ? । गुरु मोठे थोर ८
बाबा आमुचे, आम्ही बाबांचे । दूजे न अंतर
एकजीव हो 'अद्वैतात्मा' । जीवनाचे सार ९
दर्शनमात्रे जळती पापे । शुद्धभाव थोर
भावापाशी साई ठाकती । होई साक्षात्कार १०
आम्ही न लिहिले, लिहविल्या ह्या । त्यांनी ओळी चार
कविद्वयांना त्यांची प्रेरणा । झाली अनिवार ११

# गीत दुसरे

कथा सांगतो बाबा साईंची । घ्या हो ऐकून
शांत चित्ती ती मनी साठवा । ध्यान देवून ! १

चांदभाईचा घोडा हरवला । झाला बैचेन
काखोटीला खोगिर घेऊन । धुंडतो तो वणवण ! २

झाडाखाली बसले साई । चिलीम भरून
हाक मारली चांदभाईला, । 'मार झुरके दोन ! ३

'का रे झालाशी वेडापिसा तू ? । तुझे चुकले कोण ?'
'घोडा हरवला माझा बाबा ! । झाले महिने दोन !' ४

'ओढ चिलीम ही, वेडा कुठला ? । घे रे, सावकाशीनं !
चरतो आहे, पलिकडेच तो । टेकडीच्या जाण !' ५

चांदभाईला घोडा दिसता । गेला हरखून
'अवलिया' हा खासच आहे । गेला भारावून ! ६

'धूप' खेडयाला आले बाबा । एका प्रसंगानं
चांदभाईच्या वरात घरची । निघाली थाटानं ! ७

आगमन झाले बाबांचेही । त्याच वरातीनं
'शिर्डी' ग्रामी बाबांचा झाला । निवास तेव्हापासून ! ८

'गंगागिरां'नी त्यांना ओळखले । वैष्णव म्हणून
म्हाळसापतींनी हाक मारली । 'आवो साई' म्हणून ! ९

निंब वृक्षाच्या खाली बैसती । धुनी पेटवून
'आत्मानंदी' तल्लीन होती । ध्यानमग्न बनून ! १०

पोरेठोरे मारती गोटे । वेडा त्यांना म्हणून
टवाळखोरही करी टवाळी । दुबळ्या तोंडानं ! ११

झाडेझुडपे सगेसोयरे । निवडुंगाचे बन
'लेंडीबागे'चा निवास त्यांचा । एकांतवास जाण ! १२

साप, किरडे, सरुड, फरडे । त्यांच्या अंगावरनं
हिंस्र पशूंची सोबत त्यांना । फिकिर नसे क्षण ! १३

समाधीमध्ये तल्लीन राही । 'स्थितप्रज्ञ' जाण
अज्ञ जनांच्या माकडचेष्टा । घेती खपवून २४

पाच घरांची भिक्षा मागुनी । चालवी जीवन
परमेश्वराचा बंदा सेवक । स्वतःस म्हणवून १५

फाटके तुटके नेसुनी बाबा । विदेही बनून
पिशाच्चापरी राही तेथे । ब्रह्मांड गिळून ! १६

'जाणत्यां'नी विचार केला । हे भलते ध्यान
'अनाम' 'अरूप' साईबाबा । नव्हेत सामान्य ! १७

कुतुहलाने जमती सगळे । सोमे, गोमे, लहान
काही शहाणे पारख करती । अती आदरानं ! १८

सहवासाने ओळख पटली । कित्येकांना 'जाण'
सुगंध पसरला कीर्तिचा तो । चहुमुलुखी छान ! १९

साई वदती भक्त जनांना । समाधी आहे महान
उकरा येथे दिसेल तुम्हा । माझा गुरु कोण ? २०

उकरता त्यां 'तुरबत' दिसली । भूमीमध्ये सान
अंतरीचे गूढ उकलिले । साक्षात्कार महान ! २१

त्याच जागी बाग फुलविली । फुलली फुले छान
'साईनाथ' पाणी घालती । आपुल्या हातानं ! २२

समाधीस्थान साईगुरुंचे । शिरडी गावी महान
पुण्यपावन तीर्थक्षेत्र ते । चरणी वंदन २३

कवीवरांना परमानंद हा । हे जसे कुंजवन
कृष्ण सख्याचा वाजे पावा । नाद घुमे छान ! २४

# गीत तिसरे

निंब वृक्षाच्या छायेत बाबांनी । अग्नि चेतविला
शंभर वर्षे होउनि गेली । अखंड तोची पहिला ! १

'धुनी' त्यांची ती पेटत राहिली । 'उदी' नाम तिजला
रोगावरती औषध बाबांचे । तीच देत सकला ! २

उदीच्या त्या एका चिमटीने । गुण ये सर्वाला
झुंबड उडाली शिर्डी ग्रामी । जो तो पळत सुटला ३

चमत्काराने नमस्कारही । तेथे सुरू झाला
साईबाबा 'योगी महात्मा' । 'अवलिया' ठरला ४

कीर्ति–सुगंध तो पसरत गेला । चारी मुलखाला
एकमेकांच्या तोंडाने मग । बोलबाला झाला ! ५

नास्तिकांना आला अनुभव । नमस्कार केला
पाखंड्यांचा गर्व हरपला । गुरू त्यांनी केला ६

साईबाबा येउनी राहिले । शिरडी गावाला
तेव्हापासुनी तीर्थक्षेत्र ते । आले उजेडाला ! ७

पुण्यक्षेत्र ते पावन ठरले । भाविक भक्ताला
'नाभी, नाभी' शब्द बाबांचा । परिसर भारावला ८

आगळा वेगळा संतश्रेष्ठ हो । साईबाबा ठरला
सर्वांभूती परमेश्वराचा । अंश तो दाखविला ९

# गीत चौथे

भक्तजनांचा सदाच मेळा । बाबाभोवती जमला
तीन खणांची खोली बाबांना । बांधली रहाण्याला ! १
शिर्डी गावचे 'काशीराम शिंपी' । लागले चरणाला
गृह, गृहस्थी, गुरुसेवा रत । दिनक्रम ठरला ! २
मिळवित होते 'पैसापानी' । पुंजी गाठीला
घ्यावे त्यातील 'लागतील ते' । म्हणती बाबाला ! ३
दररोज 'मी' देतो बाबाला । 'मी'पणाच भरला
अहंकाराची खूण ओळखे । बाबा अंतरला ! ४
'नको म्हणाले', बाबा, परंतु । 'दातृत्वे' नटला
'गर्वाचे ते घर खालती' । तत्वबोध विसरला ५
मागू लागले बाबा 'सारखे' । परीक्षा घेण्याला
'खालावत गेला' काशीराम तो । उसने मागण्याला ६
'त्रिविधतापे' पोळला बिचारा । अभिमान नडला
काय मानव देउनी देईल ? । तुच्छ जगी ठरला ७
'देणारा तो' वेगळाची, या । जगता पोसण्याला
'विश्ववंद्य', विश्वंभरची तो ! । वंदन चरणाला ८
मुक्त हस्ताने त्याने दिधले । जीव–जंतूला
पशुपक्षांची घेई काळजी । मानवही तरला ! ९
काशीरामाला मर्म उमगले । 'मी'पणाही जळला
श्रद्धा, सबुरी तत्त्व बाबांचे । उमगले त्याला १०
पुढे एकदा काशीरामाला । चोरांनी पिटला
शिरडीमध्ये बाबा ओरडे । 'बळ' अंगी उठला ११
आठव करता बाबांचा तव । हत्ती अंगी शिरला
काशीरामाने चोरा 'दणकले' । विजयी तो ठरला ! १२
साईबाबांच्या 'कृपाआशीर्वादे' । संकटी तो तरला
लिहिता ओळी कवीवरांना । परमानंद झाला १३

# गीत पाचवे

‘ रामनवमीचा ’ उत्सव बाबांनी । केला मशिदीत
पाळणा बांधुनी स्वत: रंगले । भजन कीर्तनात १

कृष्णजन्माची ‘ गोकुळाष्टमी ’ । तिथेच भरवीत
जाती–पातींचा भेद नसे बा । त्यांच्या वागण्यात २

समतावादी संत श्रेष्ठ तो । मानी ‘ मानव ’ जात
‘ मानवपूजा ’ देवपूजा ती । भक्त त्याचे गोत ! ३

दासगणूंना केला उपदेश, । ‘ बोंब जा मारीत ’
‘ बोंब कोणती ? ’ ‘ हरीनामाची ’ । शिरले टाळक्यात ४

दासगणूंनी केले कीर्तन । साईंचे गुण गात
प्रयाग, काशी त्यांना भेटली । त्या शिरडी गावात ५

‘ ईशावास्यमिदं सर्वं ’ । आहे उपनिषदात
भाष्यावरती शंका ‘ गणू ’ना । ‘ गुरु ’ पुरवा हेत ! ६

बाबा बोलले, ‘ पारल्यास जा । दीक्षित घरात
‘ मोलकरीण ’ ती शंका निवारील । येईल ध्यानात ! ’ ७

‘ मी ’पणाचे ओझे नव्हते । त्या मोलकरणीत
नच अभिलाषा त्यागी जीवन । पाहुनी ते स्तिमित ८

‘ ईशतत्व हे अमानित्व ’ ही । दिसले मोलकरणीत
शंका सरुनी, बोध पटला त्या । लहान पोरीत ! ९

उच्चनीचतेच्या भिंती नव्हत्या । त्यांच्या मशिदीत
सर्व लेकरे ‘ त्या ईशा ’ची । अल्ला भगवंत १०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

( साकी )

साईनाथ आमुचे । सद्‌गुरु साईनाथ आमुचे ॥ धृ० ॥
तारक भक्तांचे । सहाय्या धावती सत्वाचे
जाता शिरडी । होईल सार्थक जन्माचे १
मोक्ष पदाचे, स्थान शिरडीशी । आहे ते सांचे
घ्यावी प्रचिती–इतरां द्यावी । व्हावे भक्त चरणांचे २

# गीत सहावे

चिंध्या–चांध्यांनी फळी टाकली । होती मशिदीत
बाबा झोपती अरुंद फळीवर । कुणा न उमगत १
एकरूप ते चराचराशी । सामर्थ्य अंगात
सर्पां–विंचवांचे विषही उतरे । केवळ स्पर्शात २
दरवेशाचा वाघही मारुनी । नेला तो मुक्तीत
डरकाळी तो देउनी ‘ सुटला ’ । मशीद माईत ३
देणेकरी तो दरवेशाचा । पहिल्या जन्मात
फेडित होता, कर्ज हो त्याचे । मालविली ज्योत ४
बहुरूपी ते बाबा पालटे । विदेहावस्थेत
योगीराजाची ‘ यौगिकावस्था ’ । होती हो बदलत ५
केतकीसम गौर कांती । उभार बांध्यात
साई म्हणजे परब्रह्म ते । होते हो शिरडीत ! ६
उंचपुरे ते भव्यकपाळी । उंचवटा त्यात
लांबसडक ती बोटे हातांची । गुडघ्या स्पर्शित ७
‘ अजानुबाहू ’ सतेज नेत्री । साक्षात भगवंत
भक्त जनांची पुरवी कामना । करी चिंतामुक्त ८
डुयिस छाटी, हाती टमरेल । सटका तो हातात
अंगी कफनी दृष्टीत दुखणी । उदी ती चिमटीत ९
ऋद्धीसिद्धी प्राप्त बाबांना । सिद्धपुरुष खास
दत्तगुरुंची कृपा बाबांना । पुरवी त्यांचे हेत ! १०

# गीत सातवे

भक्तजन हो देती दक्षिणा । बाबांच्या हातात
दक्षिणेतुनी खर्च चालवी । आपुल्या मशिदीत ! १
त्यांना पाहिजे ' तेवढेच घेती ' । आपुल्या हातात
जादा आलेले ' नकोच म्हणती ' । देती त्यांना परत २
रोज मागती तेल तेल्यांना । घालण्या ' पणती 'त
त्या तेलावरी पेटत होत्या । पणत्या मशिदीत ! ३
तेल देण्या तेली कंटाळले । नकार मग देत
बेत सर्वांनी मिळुनी केला । ' तेल नाही ' म्हणत ४
बाबांनाही जाणवले ते । आले मशिदीत
एका पणतीतील तेल प्याले । तेल्यांच्या देखत ! ५
विहिरीमधले पाणी आणोनी । ओतीले पणतीत
तेली पाहती उभे राहुनी । बाबा काय करीत ? ६
पेटल्या पणत्या त्या पाण्याने । तेली ते चिंतेत
पाय धरण्या पुढे धावले । एका मागून एक ! ७
' चुकलो बाबा ' ' क्षमा करा हो ' । हात ते जोडीत
करुणा भाकली साईबाबांची । वंदन चरणात ! ८
' सांगी-वांगी ' नाही काही ही । घडलेली बात
दिव्यत्वाचे पीकच पिकले । पुढे आयुष्यात ! ९
कवीवरांनी लिहिलेल्या ओळी । मोठ्या भक्तीत
धन्य जगी हो साईबाबा । झाले शिरडीत ! १०

# गीत आठवे

भाव तैसा देव राहतो उभा । त्या भक्तीत
' अनन्य भक्तां 'ना स्थान मोठे । भक्तीच्या शास्त्रात ! १

' बायजाबाई कोते ' भक्तीनं मोठ्या । बाबांच्या सेवेत
जनाबाईच त्या विठुरायाच्या । जशा पंढरीत ! २

निरागस नि निरामय सेवा । त्याग ही वृत्तीत
खाऊ घालण्या धुंडती ' बाबा ' । वणवण रानात ! ३

मोठा अधिकार बायजाबाईचा । पुढे सांगेन मात
शबरीच्या त्या उष्ट्या बोरांची । किंमत राघवात ! ४

' पाही जो मज, त्याला मी पाहीन ' । ही माझी रीत
साईबाबांनी वर्तविले जगी । आपुले भाकीत ! ५

कवीद्वयांनी गीत लिहिले । मनी गुणगुणत
साईबाबांच्या चरणी वंदन । विनम्र भावात ! ६

# गीत नववे

एक बाई आली दर्शना । मशीद माईत
' निवद ' देउनी, बसली जेवण्या । घास घेई मुखात ! १

इतक्यामधे आले कुतरे । जिभल्या चाटीत
भाकर त्याला एक टाकली । आत्मा जाणीत ! २

चिखलभरले डुक्कर आले । कुत्र्या पाठोपाठ
त्यालाही टाकली, एक भाकरी । तृप्त ते अंतरात ! ३

दर्शनास्तव बाई संध्यासमयी । गेली मशिदीत
बाबा म्हणाले, ' तृप्त झालो ' । दुपारी जेवणात ! ४

' अर्थबोध 'ही काही कळेना । गोंधळली त्यात
' श्वानसुकराशी एकात्मता ' ती । आले टाळक्यात ! ५

' सर्वात्मका ईश्वरा ' बोध हा । कळला अंतरात
साईबाबा अंतर्ज्ञानी । पेटविली ज्योत ! ६

कविद्वयांनी मर्म जाणले । आत्मबोधात
साई भजनी ज्योत तेवते । ' विदेही देहात ' ! ! ७

# गीत दहावे

आले एकदा रतन शेटजी । साई दर्शनाला
गृहस्थ पारसी वंदन करती । त्यांच्या चरणाला १
' तीन रुपये आणे चवदा । मिळाले तव मजला '
बाबा वदता भक्त पारसी । बुचकुळ्यात पडला ! २
' मी न देता ' कधी बाबांना । कसे पावले त्यांना ?
उलगडा तो त्या भक्ताला । बाबांनीच केला ! ३
' दिलेस तू रे हारा–भोजना । मौली बाबाला
नांदेडच्या त्या संता दिलेले । पोचले रे मजला ! ' ४
' विश्वंभर सर्वात्मी ' बाबा । चराचरी भरला
विश्व व्यापुनी, भरुनी उरला । आगळाची ठरला ! ५
अंतर्यामी सर्व जाणती । साईबाबा शिरडीला
परमेश्वराचे रूप, दिसले राघवाला ! ६

( साकी )

शिरडी गावी चला जाउया । साई दर्शनाला
सद्‌गुरु चरणी, वंदन करण्या । पावन क्षेत्राला ! १
भाव भक्तीचा सखा बैसला । ' ख्याली–खुशाली 'ला
सुखदुःखाचे कड निवारी । शांती आत्म्याला ! २
शिवाजी–राघव बोलत ' साई ' । अंतरात बसला
अद्वैताचे रूप दावुनी । नेत्री विसावला ! ३

# गीत अकरावे

सपत्नीक आले दादासाहेब खापर्डे । एकदा साई दर्शनाला
प्लेगाने पुत्र तयाचा त्या ठायी । वर्मी व्याकुळला ! १
बाबा पुढती येउनी बैसता । आत्मा कळवळला
अंतर्यामी जाणुनी त्याला । त्यातुनी उठविला ! २
प्लेगाच्या त्या 'गाठी' मुलाच्या । आपुल्या काखेला
ताप उतरला, त्या 'बाळा'चा । स्वतः तापी बनला ! ३
दृष्टिमधल्या शक्तीने तो । रोग बरा केला
खापर्ड्यांचा मुलगा बाबांनी । सुखरूप त्या दिधला । ४
पती-पत्नी ते गेले हरखुनी । परमानंद झाला
भक्तांसाठी सखा धावला । त्यांच्या हाकेला ! ५
चमत्कार असे किती तरी । गणती नाही तिजला
जीवदान हो दिले कित्येकां । साई ईश ठरला ! ६
खापर्ड्यांसह 'लोकमान्य' पुढती । येती दर्शनाला !
विद्वानांना आले अनुभव । लागले चरणाला ! ! ७
भक्तजनांना प्रसाद बाबांनी । 'उदी'चाच दिधला
शेवटच्या त्या 'रक्षे'चा हो । बोध त्यांनी केला ! ८
रज तम जळता काय शेवटी ? । जमा नि खर्चाला ?
'शुद्ध सत्वा'ची, 'उदी'च उरते । मानव जन्माला ! ९
नास्तिक्यांना अर्थ याचा । कधी न तो कळला
संशयात्म्ये-शंकासुरांना । देवच नाकळला ! १०
कवीवरांनी कर्पुरज्योत ही । वाहिली चरणाला
नको 'काजळी' 'शुद्ध भाव' तो । मिळू दे आत्म्याला ! ११

# गीत बारावे

नानासाहेब चांदोरकर एक । होते खानदेशात
मामलेदार ते जामनगरला । बाबांचेच भक्त ! १
' प्रसूतीकाळी ' मुलगी त्यांची । मोठ्या संकटात
वेदनेने फोडी किंकाळी । ऊर भरुनी येत ! २
चांदोरकरांनी करुणा भाकली । ' हाक ' बाबा देत
बाबांनाही जाणवले ते । कळले काळजात ३
रामगीरबुवांना दिली प्रेरणा । ' जा रे खानदेशात
वाटेमध्ये भेट नानांना । जामनेर गावात ! ' ४
' उदी ' आणि ' आरती ' त्यांना । दे रे भेटीत
समाचार घेउनी पुढे जा । तुझ्या तू गावात ! ५
' पैसे मजकडे नाहीत बाबा । चवली राहील खिशात ! '
बाबा म्हणाले, ' नको काळजी । पाहतो मी खचित ! ' ६
जळगाव स्टेशनी रामगीर उतरता । हाक ऐकू येत
एक शिपाई, म्हणाला त्याला, । ' बसा हो टांग्यात ! ७
नानासाहेबांनी टांगा पाठविला । तुम्हा कारणात
चला जामनेरी घेउनी जातो । बसा हो निश्चिंत ! ' ८
वाटेमध्ये फराळ करोनी । सकाळी जामनेरात
दाखविले दुरुनीच ऑफिस ते । शिपाई टांग्यात ! ९
लघुशंकेला उतरले रामगीरी । ' शिपाई टांगा गुप्त '
आश्चर्याचा धक्काच बसला ! । गेले विचारीत ! १०
घरी जावुनी पुसे नानांना । टांग्याची बात ?
' पाठविला मी नव्हता टांगा ' । घडले अघटित ! ! ११
' उदी ' लाविली, कन्येला ती । ' आरती ' म्हणीत
सुखरूप झाली प्रसूत कन्या । साईकृपा तीत ! १२
भरुनी आले नेत्र नानांचे । बाबा कृपावंत
' भार शिरावरी ' फेडू कसा मी ? । बाबा ते भगवंत ! ! १३
भक्तांसाठी धावे साई तो । कलि या युगात
भाव भुकेचा असे ' श्रीहरी ' । शिरडी गावात ! १४
कविवरांना दिली हो स्फूर्ती । काव्य रचण्यात
साईबाबांच्या चरणी वंदन । आनंद कंदात ! ! १५

# गीत तेरावे

देव मामलेदार रहात होते । डहाणू गावाला
उद्यापनाचे ब्राह्मण-भोजन । बेत घरी केला १
साईबाबांना पत्र लिहिले, । 'यावे भोजनाला'
परीक्षा घेण्या बाबांनी पण । चमत्कार केला ! २
चार दिवसांनी आले संन्याशी । निधी जमविण्याला
देव म्हणाले, 'यावे पुन्हा हो । पुढच्या वेळेला !' ३
भोजनसमयी तेच संन्याशी । आले भोजनाला
देवा वाटले, आले खरोखर । निधी उकळण्याला ! ४
'साईबाबा आलेच नाहीत'। वाटले देवाला !
त्यांनी बाबांना पत्र लिहिले, । 'का हो नाही आला ?' ५
उत्तर बाबांचे त्यांना परतले, । 'होतो रे पंक्तीला'
कोण्या वेशे ईश घराला । येतो परीक्षेला ! ६
विकल्पाने अभक्त ठरले । अभिमान नडला
वेशावरुनी नको हो पारख । ओळख आत्म्याला ७
आत्मा–आत्म्याने जाणला तर । जगी तोची तरला !
'कपटभाव' येताच मनी मग । पश्चाताप बोला ! ८
साईबाबांच्या भाव मनीचा । कुणा न तो कळला
ईश आगळा जगा वेगळा । शिरडी अवतरला ! ९
खजील झाला देव मामलेदार । 'चुक उमगली' त्याला
बैल गेल्यावरी झोपा लावता । कोण तिथे उरला ?!! १०
आत्मा कवींचा अंतरात्मी । ध्यानमग्न झाला
ओळी लिहिण्या, साईबाबा । स्फूर्ती देई कवनाला ११

# गीत चौदावे

अग्नि पूजा, तुळशी पूजा । चाले मशिदीत !
कथा कीर्तनी टाळमृदंगी । हरीनाम गात १
सत्याचरणी आत्मशुद्धी । होते जीवनात
हिंदु–मुस्लीम उत्सव करती । मशीदमाईत ! २
स्नानानंतर बाबा कधीमधी । पितांबर नेसीत
गंध कपाळी लावुनी घेती । भाव भक्तीत ! ३
डॉ. पंडित 'त्रिपुंड' लाविती । बाबांच्या भाळात
भक्तांचेही भाव पुरविती । त्यांच्या भक्तीत ४
'मुळेशास्त्री' शिरडी आले । होते शंकित
'संध्यापूजा' त्यांची चालली । होती सोवळ्यात ५
दक्षिणेस्तव 'बापूसाहेब बुट्टी' । गेले त्या पूजेत
शास्त्र्या वाटले, कसे कळाले ? । आलो मी शिरडीत ! ६
द्वाराबाहेर उभे साईनाथ । परीक्षा ते घेत
'ब्राह्मण सोवळा' कसा करू मी ? । बाबांना प्रणिपात ? ७
अभिमानाने ऊर दाटले । हात न जोडीत
दुरुनीच ते फेकती पुष्पे । बाबा ते पहात ! ८
'केला चमत्कार' साईबाबांनी । उजळली ज्योत
बाबा जागी दिसे 'गोपाळनाथ' । 'त्रिपूटीचा नाथ' ९
गोपाळनाथांचे चरण वंदिता । दिसे 'साईनाथ'
रूपे बदलली क्षणाक्षणाला । झाले शास्त्री चकित ! १०
मुळे शास्त्रींचा गर्व गळाला । घातला दंडवत
दोन्ही रूपे एका 'ईशाची' । कळले इंगित ! ! ११
कविवर्यांची एकतानता । भरली काळजात
आनंद मावेना अंतःकरणी । गेला गगनात ! ! १२

# गीत पंधरावे

राम उपासक एक डॉक्टर । शिरडीला आले
' नमस्कार मी, बाबा न घालीन ' । मित्राला वदले ! १
मशीदमाईत दोघे बाबांच्या । सामोरे आले
नम्र होवुनी चरण बाबांचे । मित्राने धरले ! २
नम्र न झाले डॉक्टर, नेत्र पण । बाबांवरी खिळले
' राममूर्ती ' ती दिसू लागली । ' अघटित आकळले ' ३
देहभान हरपुनी डॉक्टर । राघवानंदी डुंबले
सार्थक झाले त्या जन्माचे । नेत्रची उघडले ! ! ४
' वरल्या रंगा भुलणे खोटे ' । मर्म ते उमगले
परमानंदी तृप्त होउनी । साई चरण धरिले ! ५
ओळख पटली ' श्रीरामाची ' । रामरूपी नटले
साईरूपी ' राम विनटले ' । भ्रमपटल तुटले ! ६
जुळता ओळी कवीरायांचे । नेत्रपटल भरले
आनंदाचे नेत्रीं अश्रू । गाली ते ओघळले ! ! ७

□ □

( साकी )

धन्य धन्य सद्‌गुरु । साईनाथ, धन्य धन्य सद्‌गुरु
अगाध ' कल्पतरु ' । साईनाथ, अगाध कल्पतरु १
भवदुःख निवारु, साईनाथ । विविधताप हारु
आमचे श्रीसद्‌गुरु साई । आमचे परम सद्‌गुरु २



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
(स्थळ प्रत)

# गीत सोळावे

वासुदेवानंद नि साईबाबा । एका वेळेचे
अग्नी उपासक, होते दोघेही । जसे बंधु साचे । १
राजमहेंद्रीला आले पुंडलिक । वकील नांदेडचे
हितगुज बोलती 'वासुदेवानंदा' । साई बाबांचे । २
गहिंवरोनी नंद जोडती । हात ते प्रेमाचे
'परब्रह्म प्रत्यक्ष नारायण' । म्हणती विश्वाचे !! ३
निरोप देतां श्रीफळ नंदांनी । दिले एक प्रेमाचे
'हृदयी धरोनी' हाती दिले ते । वकील पुंडलिकांचे ! ४
शिरडी जातां, संगे मित्र हो । होते पुंडलिकांचे
ओढ्याकाठी 'चिवडा खाता' । तोंड पोळले त्यांचे ! ५
त्या समयाला नारळ फोडला । भान न कोणाचे ?
'प्रिय प्रतिका'ची वाट लाविली । मर्म गेले साचे ! ६
साई जवळी जाता अडखळे । 'बोलू काय वाचे ?'
'दुसरा नारळ आणुनी देतो मी' । वकील वदे वाचे ! ७
'नारळ नव्हता दिला, नंदांनी । काळीज जे त्यांचे
तेची गमावुनी आला मोकळे । माझ्या नंदाचे !!' ८
'नारळ फोडला', टाका अहंभाव । तुम्ही एकदाचे
परमेशाच्या हुकुमा विना रे । 'पान न हाले' साचे ! ९
कवी द्वयांना गूढ उकलले । 'त्या नारळाचे'
कृष्णावतारी अरूप ठरले । पोहे सुदाम्याचे !! १०

# गीत सतरावे

नवा धर्म वा पंथ न स्थापिला । साईबाबांनी
सत्य, सहिष्णुता, प्रेम, एकता । मंत्र दिला त्यांनी १
योगाभ्यासी एक साधू । लीन साई चरणी
पुसू लागला, साईबाबांना । 'समाधीतत्व' करणी ! २
बोध केला, त्या योग्याला । पचेल तसाच झणी
कर्मकांडाचे थोतांड बाबांच्या । कधीच नव्हते मनीं ! ३
सांताक्रूझचे धुरंधर घराणे । पांडुरंग चरणी
साईबाबांच्या दर्शना येतां । संतोष त्यांच्या मनी ! ४
बोलता बोलता चिलीम दिधली । 'बाळारामा' कारणी
'झुरके मारता' दमा तयांचा । पळालाच झणी ! ५
भिंतीवरची 'पाल' चुकचुकली । शंका भक्तांच्या मनीं
बाबा म्हणाले, थोड्या वेळाने । 'भेटतील दोघी भनी !' ६
घोड्यावरुनी आला भक्त एक । बाबांच्या दर्शनी
'तोबरा' झटकता, पाल निघाली । बाहेर त्यातुनी ! ७
कडकडुनी त्या, भेटल्या आनंदे । लगेच भनी-भनी
भिंतीवरचे हितगुज त्यांचे । आले भक्तां कानी ! ८
चराचरांशी बाबा एकरूप । पेटविली 'जगधुनी'
'खळा-मळांची' सदैव धुतली । त्यांनी भक्तांची धुणीं ! ९
'सर्वात्मका, परमात्मा' भरला । जगी या कणीं-कणीं
'श्रद्धा, सबुरी' विचार बाबांचा । थोर त्यांची करणी ! १०
छंद लागला नाथसाईंचा । रत झालो चरणी
कृपा शिरावर वरद्हस्त तो । लिहिते आमुची झरणी ! ११

# गीत अठरावे

एका नदीकाठी हो गिळत होता । सर्प बेडकाला
आक्रोश त्याचा कानी येता । वाटसरू बावरला ! १

पळत येउनी, सांगे बाबांना । बेडूक त्याने गिळला
'मरणयातना' सुरू तयाला । वाचवा हो त्याला ! २

बाबा म्हणाले, 'बाप आहे मी । बेडका वाचविण्याला
नको काळजी करूस बाळा । सोडवीन त्याला ! ' ३

जवळ जाता, बाबा म्हणाले, । ' बेशरम कुठला ?
वीरभद्रा रे, तंटा नाही का ? । बसाप्पाशी मिटला ! ' ४

बेडूक सोडला, सर्पाने अन् । सळसळत गेला !
बेडूक बिचारा काळदाढेतुनी । सुखरुपी सुटला ! ५

जन्म 'भद्राप्पा'चा ब्राह्मणापोटी । मथुरेत झाला
गरीब गुरवाच्या घरी 'बसाप्पा' । जन्मालाच आला ! ६

देण्याघेण्याच्या 'वादा'वरुनी । कली तो संचरला
ठार मारण्या एकमेकाला । जो तो मनी टपला ! ७

उन्मादवायुने दोघेही मेले । वीर सर्प झाला
बसाप्पाही बेडूक होउन । सर्पा सापडला ! ८

पूर्वजन्मीचा तंटा आठवुनी । बाबांनी सोडविला
करुनी 'अकर्ता' 'अकर्तात्मबोध' । जगताशी दिधला ! ९

श्री दत्तगुरूंनी दिला जनार्दना । त्यांनी एकनाथाला
साईनाथ हा नाथपंथीय । योगी अवतरला ! १०

जीवा-शिवाचा खेळ मांडिला । कली या युगाला
भक्तां तारिलें 'अकर्ताबोधे' । 'नुरोनिया ठेला !' ११

# गीत एकोणिसावे

साईबाबांचे जीवन अगदी । साधेसुधे होते
सोवळे-ओवळे उपासनेचे । नियम काही नव्हते ! १

जीवन्मुक्त, जन्मसिद्ध पुरुष ते । योगीश्वर होते
'धौती–नौली' खंड योगाचे । 'सिद्धपुरुष' होते ! २

जेवण करता, कुत्र्या-मांजरा । हाटकले नव्हते
साई बाबांच्या पात्री जेवण । त्यांचेसह होते ! ३

बाबास्तव केले जेवण कुणीही । भक्त खात होते
कितीही जेवले भक्त तरीही । जेवण सरत नव्हते ! ४

खास वस्तू होत्या बाबांच्या । 'दळणाचे जाते'
महामारीचे पीठ दळुनिया । संकट हटविले होते ! ५

शांततेचे प्रतीक 'पणती' । धुनीजवळ होते
नश्वरतेचे मृत्तिका पात्र ही । हाती विराजते ! ६

वैराग्याचा 'सुटका' 'कफनी' । समतेचे नाते
उत्तमपुरुष साईबाबा ते । अवडंबरी नव्हते ! ७

# गीत विसावे

आण्णासाहेब वाट पाहती । बारा वाजले होते
'जेवणास मी येईन तुजकडे' । स्वप्नी कथिले होते ! १

आगमन नाही झाले बाबांचे । दोन मुस्लीम तेथे
अल्ली महमूद, इस्मू मुजावर । नाव तयांचे होते ! २

'आपली वस्तू ठेवा' म्हणोनी । निघून गेले परते
नाव-गाव ते विचारायचे । राहून गेले त्यांचे ! ३

दोघे जाता, वस्तू पहाता । चकित झाले सारे
तसबीर पाहुनी बाबांची । आण्णासाहेब हळहळले ! ४

बाबांच्या पात्री मांडुनी ती । निमंत्रित मग जेवले
भक्त जनांची पुरवी कामना । बाबा भक्तीं रमले ! ५

लीला ऐकता साईबाबांची । चित्त थक्क होते
साई भक्तांचे मन डोलते । चरणी लीन होते ! ६

□ □

## साकी

राम रहिम एकची हो भाई । सांगतसे साई
दया शांतीची, त्यांनी घातली । पहा पाणपोई १

नकोत झगडे, जातीभेदाचे । मालिक एक हाई
जीव पोसण्या, त्याची कृपा हो । त्याचीच नवलाई २

# गीत एकविसावे

चितळे हरिश्चंद्र शिरडी गावी । आला दर्शनाला
दर्शन घेता दिले बाबांनी । तीन रुपये त्याला ! १
पूर्वी असे मी दिले रे होते । दोन रुपये तुजला
त्यात ठेव हे तीन आणखी । होतील पूजेला ! २
चितळे कधीही नव्हते आले । साई दर्शनाला
बोध कळेना, दोन रुपयांचा ? । पुसती आईला ! ३
आई म्हणाली ' तुझे वडील रे ' । गेले ते अक्कलकोटला !
श्री स्वामींनी, दिले होते रे । दोन रुपये पूजेला ४
थांब दाविते ! देवघरातील । आताच रे तुजला !
आश्चर्याचा धक्का बसला । ऐकून ते चितळ्याला ! ५
स्वामी समर्थ नि साईबाबा । एकाच वेळेला
दुजे ते नव्हते एकरूप ते । परब्रह्म बोला ! ६
साईबाबांचे नाम वदता । परमानंद झाला
साईभक्तांनी सद्‌गुरुंचा । जयजयकार केला ! ७

## गीत बाविसावे

शिरडी गावी आकांत झाला । पाऊस मुसळधार
गुरे, माणसे पळता पळता । झाली हो बेजार ! १
जगबुडीच ती होते वाटली । कुणा नसे धीर
वारा सुटला झंझावाती । जो तो पळे, वाटे घोर २
कड ‡ डाट नि चमचमाट तो । वीज चमके फार
जो तो म्हणतो, 'आता न जगतो' । झाला हाहा:कार ! ३
मशीद मंडपी साईबाबांनी । दिधला आधार
'हट जाव, हट जाव' म्हणती पावसा । 'करो अब सबूर !' ४
तारसुराने बाबा ओरडे । कमी झाली धार
हटला पाऊस संकट सरले । झाले विनघोर ५

## गीत तेविसावे

भर दुपारी मशिदीमध्ये । अग्नि कोपलेला
भिडल्या जिभल्या तक्तपोशीला । आग ओकण्याला ! १
कुणा सुचेना, काय करावे ? । जो तो घाबरला
'होणार होळी' आता मशिदीची । चिंता सर्वाला २
नजर टाकिली बाबांनी अन् । दिला हात 'सटक्याला'
'फटाफटा' हो मारुनी सटके । अग्नि शांत केला ३
'चल शांत हो, हट बाजूला । फटका दे अग्निला'
अग्निदेवही अंकित झाला । बाबांच्या शब्दाला ४
अग्निदेवाचा बाबा उपासक । 'धुनीनाथ' ठरला
साईभक्तांनी मुक्त कंठी मग । जयजयकार केला ५

# गीत चोविसावे

बाळा गणपत शिंपी होता । बाबांच्या सेवेत
हिंवताप तयाचा जरा हटेना । दवापाणी व्यर्थ १
' शरण गेला ' साईबाबांना । करुणा भाकीत
हिंवताप माझा तुम्ही घालवा । जोडी दोन हात ! २
बाबांनी मग उपाय कथिला, । 'आण दही भात
काळ्या कुत्र्याला खाऊ घाल । जा लक्ष्मी रावळात ! ' ३
घरी जाउनी चौकशी करता । होता केला भात
दही ओतुनी, मुटके करुनी । गेला देवळात ! ४
' काळे कुत्रे 'ही तिथेच होते । शेपूट हलवीत
खाल्ला प्रसाद मजेत त्याने । ' मचामचा ' करीत ! ५
बाळा शिंप्याचा हिंवताप गेला । साई कृपेत
हिंवतापाची कथा ऐकुनी । हटवा भवताप ६

# गीत पंचाविसावे

बापूसाहेब बुट्टी गेले घाबरुनी । सारखे जुलाबाला
औषध घेउनी उपाय त्यांचा । साराच थंडावला १
दिसू लागले ' मरणदार ' त्या । ' बाबा ' शरण आला
हातापायामध्ये त्राण तयांच्या । काहीच तो नुरला २
पुढे बाबांच्या आणुनी बसविता । ध्यानमग्न झाला
' हाल्ह नको रे तसूभरही ' । जुलाब तुझा गेला ३
साईकृपेने ' उलट्या ' थांबल्या । जुलाब थंडावला
जाणून घ्यावे मर्म भक्तीचे । साई चरणाला ५

□ □

( साकी )

वंदन साईनाथा । ठेवितो, चरणांवरी माथा
शरण तुला आता । सद्‌गुरु, पदकमली माथा १
लिहिली आम्ही ' लीला गाथा ' । वाटते, तुझी पूज्य गीता
नच सोडू, चरण आता । गीत हे, सदा तुझे गाता २

# गीत सव्विसावे

ब्रह्मजिज्ञासू ब्रह्म जाणण्या । आला एक शिरडीला
' चटकन मजला, ब्रह्म दाखवा ' । म्हणे साईनाथाला ! १

युक्ती योजुनी बाबांनी मग । पोऱ्या एक पाचारिला
उसने आणण्या ' पाच रुपये ' त्या । घरी एका धाडला ! २

' नन्ना करीत ' परत आला । दुज्या घरी पिटला
तसाच आला ' हात हालवित ' । मार्ग तयाचा खुंटला ! ३

नाटक केले बाबांनी हे । परीक्षा घेण्याला
ब्रह्मजिज्ञासू हात न लावी । आपुल्या गाठीला ! ४

रुपये अडीचशे खिशात त्याच्या । त्याच वेळेला
' पाच रुपये ' त्यातील द्यावे । सुचले नाही त्याला ! ५

कळले नाही ' मर्म ' तयाला । लोभी जिज्ञासूला
' फुटकी कवडी ' कुणी न बांधते । अंती मानवाला ! ६

' विरक्ती ' लागते अंगी बाळा । ब्रह्म जाणण्याला
ज्ञान, अहंबुद्धी, मन सारे । अर्पण करण्याला ! ७

' देहात्मबुद्धी ' हीच भ्रांती । कळले नाही तुजला
' जन्ममरण ' रे नच आत्म्याला । आत्मा अमर ठरला ! ८

' यमनियमांची ' ध्यान धारणा । गिरीकंदराला
केली तरीही नाही कळत रे । ब्रह्मज्ञान तयाला ! ९

' लोभी माणसा ' ब्रह्मज्ञान मग । व्हावे कैसे तुजला ?
' लोभी ब्रह्माचे ' वैर अखंड रे । शांती न मिळे तुजला ! १०

राघव-सावंत लिहिता ओळी । द्वैत भाव नुरला
दोन्ही तनुंच्या, एक मनाने । ग्रंथ हा अवतरला ११

# गीत सत्ताविसावे

अनंतराव पाटणकर वेद–वेदान्ती । पुणे नगरीत
‘ नव्हती शांतता, तशी स्थिरता ’ । होते तळमळत ! १
गेले शिरडीला, पुढे बाबांच्या । हात ते जोडीत
ग्रंथवाचन, शास्त्र आलोकन । सर्व गेले व्यर्थ ! २
‘ नसे शांतता मम जीवाला ’ । साईंना वदत
उपाय सांगा ‘ स्थिर चित्ताचा ’ । करा माझे हित ! ३
साईनी तया दिधला रोकडा । दाखला तिथेच मग एक
सौदागरचा घोडा उभ्याने । लेंड्या हो टाकीत ! ४
सौदागरला आज्ञा देई साई, । ‘ बांध लेंड्या फडक्यात !
दे अनंता- स्थिर करण्या चित्ता । प्रसाद मम हाच ! ’ ५
‘ नऊ लेंड्या ’ त्या सौदागराने । बांधल्या फडक्यात
गोष्ट संपली साईनाथाची । ध्या हो ध्यानात ! ६
केळकरानी फोड हो केली । ‘ साईकृपा ’तीत
श्रवण, कीर्तन, अर्चन, वंदन । सख्य, दास्य, चरणसेवनात ! ७
आत्मनिवेदन, ‘ नवविधाभक्ती ’ । करावी भक्तीत
साईबाबांच्या बोधामृते ते । झाले शांतचित्त ! ८
कविद्वय जोडती हात भक्तीने । करुनी शांत चित्त
नवविधाभक्तीचे कळता इंगित । बोला ‘ जय साईनाथ ’ ९

# गीत अठ्ठाविसावे

'अण्णा चिंचणीकर', साई सेवारत । आले शिरडीला
स्वभावाने ते होते तापट । भडका उडविण्याला ! १

बसले होते बाबा आसनी । जो तो त्या सेवेला
चुरती कुणी पाय तयांचे । कुणी हात चेपायला ! २

दावित होता अण्णा हात डावा । त्या सेवा समयाला
विधवा 'वेणुताई' पोट दाबता । तोंडापुढे आला ! ३

'मुका घेता काय' काहो माझा ? । आरोप तिने केला
चिंचणीकरांचा पारा चढला । गगनावरी गेला ! ४

'बोळके तोंडाचे' झाले होते । दात नव्हता तयाला
वेणुताईही होत्या वयस्कर । 'मुका' कसला मेला ? ५

बाबांनी मग उपदेशाने । तंटा मिटविला
'मुका' घेउनी जाईल 'फुका' तो । अर्थ जाणत्याला ! ६

बाबा म्हणती, काम क्रोधाने । जो तो जगी जळाला
विरक्तीने माणूस सुटला । जीवन्मुक्त झाला ! ७

हव्यासाने मुका घेउनी । साध्य काय बोला ?
'कातड्याला चिकटे कातडे । अंती जळुनी मेला !' ८

आत्म्याचा परमात्म्याशी, योग न जुळता । 'द्वैतभाव' उरला
बाबा म्हणती, जन्मा येउनी । व्यर्थ जगी ठरला !! ९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५८५
२५८८
काव्य
२७१२५८
शाखा (स्थळ प्रत)

# गीत एकोणतिसावे

ग्वाल्हेरचे ते डॉक्टर 'हाटे' । बाबांच्या भक्तीत
'कॅप्टन' होते लष्करात ते । मोठ्या हुद्यात ! १
साईबाबांनी विचारले त्या । 'स्वप्नी त्यांच्या येत'
'का रे कॅप्टन मला विसरला ? । काय तुझी रीत ? !' २
'वालपापडीच्या शेंगा' त्या स्वप्नीं । दिल्या हो 'शिध्यात'
स्वप्न भंगता डोळे उघडले । साई झाले गुप्त ! ३
काकासाहेबांना पत्र पाठविले । त्यांनी मुंबईत
'शिधा' 'दक्षिणा' द्या हो बाबांना । 'बारा रुपयात' ! ४
मनीऑर्डर पाठवुनी काकांना । कळविले पत्रात
'वालपापडीच्या शेंगा' बाबांना । 'आणा हो खचित' ! ५
'शिधा सामग्री' घेतली परंतु । पापडी नसे तीत
वाटेमध्ये शेंगा मिळाल्या । पूर्ण झाल्या शिध्यात ! ६
दुसरे दिवशी शिधा जेवता । बाबा झाले तृप्त
वालपापडीच्या शेंगाच खाल्ल्या । मोठ्या आवडीत !! ७
हाटे डॉक्टरांना पत्र देवुनी । दिधला वृत्तांत
वालपापडीच्या शेंगा आवडीने । होते बाबा खात ! ८
अंतःकरणाची ज्योत हालली । भिडली ज्योतीत
साईबाबांना त्रिवार वंदन । आनंदाश्रू नेत्रात ! ९
सुदाम्याचे पोहे खाल्ले । श्रीकृष्णावतारात
महिमा मोठा भावभक्तीचा । मती गुंग होत !! १०

# गीत तिसावे

‘ बिनिवाले ’ नि ‘ नाना चांदोरकर ’ । आले हो शिरडीला
त्यांना पहाता, बाबा म्हणाले । ‘ भ्रम तुम्हा झाला ’ १
‘ काय रे नाना ? तू शिकलाशी । विचार मनाला ?
चूक केवढी झाली आज रे, । पूस अंतराला ? ’ २
विचार करता, नाना उमगले । डावलले दत्ताला
वाटेवरच्या भगवंताला । आम्ही कसा वगळला ? ३
गोदावरी पात्री स्नाना जाता । काटा पायी घुसला
वेदनेने व्याकुळ होवुनी । जीव असे तळमळला ! ४
‘ कोपरगावाहुनी थेटच आलो । आम्ही दर्शनाला
परत जाताना भेटणार होतो । श्रीगुरू दत्ताला ! ’ ५
बाबा म्हणाले, ‘ अनादर करता । तसेच घडेल तुजला
पावणार मी कसा सांग रे ? । तुझ्या ह्या भक्तीला ? ६
सरकार माझे दत्तगुरु ते । त्यांच्या मी पूजेला
रात्रंदिन तो सखा-सोयरा । हृदयी मम बसला ! ’ ७

□ □

( साकी )

धाव पाव सद्‌गुरु साईबाबा । भक्त तारका भगवंता !
तुझे नाम स्मरता भक्तजन । जाती ईशा रे मोक्षपदा ! १
शिरडी जावुनी हाती उदी घेता । समाधान रे होईल चित्ता !
कविद्वय म्हणती, सिद्धपुरुष तू । तुझी आम्हावरी रे सत्ता ! २

# गीत एकतिसावे

बाबा म्हणती, भक्त जनांना । संता शरण असावे !
वात भेटता जशी ज्योतीशी । दिव्य रूप पहावे ! १
'अल्ला मालिक' तो सगळ्यांचा । त्यासी नित्य भजावे
'निर्ममत्व' निरहंकारी वृत्तीने । त्यासी आळवावे २
निष्परिग्रही, निर्द्वंद्वत्वाने । 'मी'पण गमवावे
'अज्ञान'वाणीचा विषय आहे रे । 'ज्ञान' जगी मिळवावे ३
ज्ञान शब्दाच्या पलिकडचे रे । तयासी कष्टे साठवावे
'वार' गर्भाला जशी वेढते । 'आरशा' झटकावे ४
निखाऱ्यामधे 'स्फुल्लिंग' कोणता ? । त्यास ओळखावे
ज्ञान आहे रे 'स्वयंसिद्ध' ते । तिमिर हटवावे ! ५
पाण्यावरचे शेवाळ हलक्या हाती । स्वतःच सारावे
देहाभिमान हे अज्ञान आहे । न मायारूपी जावे ! ६
माया लटकी आहे, चेटकी । तिजला विसरावे
निराभिमानी राहुनी 'ईशा'शी । एकरूप व्हावे ! ७
दुनियेच्या या पाठीवरती । कुठेही फिरत रहावे !
छायेसम मी मागे पुढती । कधी न विसरावे ! ८
पशुपक्षी अन् किडा-मुंगीतही । तुम्ही मज पहावे
सर्व प्राणी, पुरुष-स्त्रियांतही । मजशी धुंडावे ! ९
जळी-स्थळी अन् काष्ठी-पाषाणी । 'दत्तरूप' साई बघावे
भावभक्तीने लीन होवुनी । विनघोर व्हावे ! १०
शिवा-राघवा बोध पटे हा । श्री साईचरण धरावे !
आपण तरावे-नम्र भावे । इतरांस सांगावे ! ११

# गीत बत्तिसावे

बाबा म्हणती, " माझे शब्दावर । विश्वास तुम्ही ठेवा
शिरडी येता ' धुनी 'मधली । ' उदी ' घेवुनी जावा ! १
मी गेलो तरी हाडे माझी हो । होतील तुमचा ठेवा
कबरही बोलेल तुम्हा संगती । हितगुज जाणावा ! २
आठवता मज सदैव राहीन । सावलीसम भावा
चिंतामुक्त मी करीन भक्तां । भक्तीभाव हवा ! " ३
परिसता चरित्र हे शिरडीक्षेत्री । जाणार तुम्ही केव्हा ?
बोध ध्यानी ध्या, तुम्हा सांगतो । बाबांचा ' सांगावा ' ! ४

# गीत तेहतिसावे

लागेबांधे धरुनी आपण, रास्त समयी । कुणाकडे जावे
आल्या-गेल्यांचा आदर करुनी । त्याशीं तोषवावे ! १

भुकेल्याला देवुनी भाकर । पाणी त्यास द्यावे
भाकरीतले परब्रह्म खरोखर । तयास दावावे ! २

उघडा अंगी असेल त्याला । वस्त्रे झाकावे
उभा असेल 'त्या' देवुनी ओसरी । बसवुनिया घ्यावे ! ३

सहिष्णुतेने काही अवघड । सोशीतच जावे
आपल्या जागी आपले आपण । खंबीर खडे असावे ! ४

ऋणानुबंधाच्या गाठी आपण । बांधीतच जावे
कुणा न दुखवित मार्गी अडसर । कधी न घालावे ! ५

सत्याचरणी वागुनी आपण । सिध्या मार्गी जावे
आडवळणाचे काटेकुटे ते । कधी न तुडवावे !! ६

साईनाथाचे बोल साचे हे । मनी साठवावे
कवीद्वय म्हणती संकट समयी । त्यास साकडे घालावे ! ७

# गीत चौतिसावे

वाटू लागले आता साईनाथा । ईश्वरचरणी जावे
ऐंशी वर्षांचे आयुष्य आपण । आता संपवावे ! १

अवताराचे कार्य आपुले । आता मावळावे
'इच्छामरणी' जीवन आपुले । आता मालवावे ! २

कळिकाळावरी मात करोनी । त्यासही पळवावे !
धुनीमध्ये टाकुनी वस्त्रें । वस्त्र हे बदलावे ३

अमर आत्मा चिरंजीव तो । परमेशी लय व्हावे
भवसागरांचे सिमोल्लंघनही । आताच उरकावे ! ४

इच्छा, मनिषा, मोहमायेचे । पाश सर्व तोडावे
पोथीवाचन करुनी घेतले । आता न ऐकावे । ५

लक्ष्मीचे दान करुनी । हात प्रक्षाळून घ्यावे
'फुटकी कवडी' संगे न येते । विरक्तीने जावे ! ६

दिस नियोजित केला दसऱ्याचा । सिमोल्लंघना जावे ।
सण हिंदूंचा, मोहरम मुस्लीमांचा । बुद्धचरण पहावे ! ७

विजयादशमीचा मुहूर्त गाठुनी । चरणी लीन व्हावे
भक्तजनांना दिधली 'वर्दी' । सिद्ध तुम्ही असावे ! ८

भक्तजनांनी केला आक्रोश । 'बाबा कुठे पहावे ?'
'पुन्हा न बोलतील, बाबा आमुचे । कुणापुढे जावे ? !' ९

कवीवर म्हणती नश्वर देहाचे । सार आठवावे !
नाथ साईंचे गुणगान करता । चरणी लीन रहावे १०

# गीत पस्तिसावे

तारीख पंधरा महिना ऑक्टोबर । घटका भरत होती
एकोणिसशे आठरा सालची । तिथी मध्यावरती ! १
भरदुपारी साई बाबांची । प्राणज्योत थरथरती
आक्रांत झाला शिरडी ग्रामी । जमीन थरथरती २
बायजाबाईना जवळ बोलावुनी । तिच्या मांडीवरती
'देह ठेविला' साईनाथांनी । विझली ती 'पणती' ३
'साईबाबा आहेत आमुचे' । हिंदू–मुस्लीम म्हणती
'दहन–दफना'चा तंटा माजला । गेला सरकाराप्रती ! ४
बहुमताच्या सह्या पाहुनी । 'दहन' ठरविती
पेटली देहाची 'धुनी' अखेरी । फुटली ती 'पणती' ! ५
बुट्टी वाड्यामध्ये बांधली समाधी । तिथेच ती सद्गती
समाधी मंदिरी त्या बाबांच्या । भक्तां नाही गणती ६
धुनीमधली 'उदी' बाबांची । कपाळी जे घेती
साईबाबा 'प्रतिपाळ' ते । सदैव भक्तांप्रती ! ७
पेटविलेली धुनी बाबांनी । अखंड ती पेटती
'समता, शांती नि एकात्मतेची' । आहेच ती पावती ! ८
भक्तजनांचा आहे 'विसावा' । जातील 'मोक्षाप्रती'
स्थान शिरडीचे 'पवित्र–मंगल' । घर आपुले म्हणती ९
दुःखितांचे दुःख हारण्या । आहेत शिरडीपती
श्रीसाईनाथ, चरणी वंदन । कविद्वय हात जोडुनी करती १८

ॐ शांतीऽ, शांतीऽऽ, शांतीऽऽऽ !!

# भैरवी

धन्य धन्य, साई जगी थोर
तयांनी व्यापिले जगती । सर्व चराचर ॥ धृ० ॥
आठव करता, भक्तांच्या ते । ठाकती समोर
कळिकाळाचे भय टाळती । भक्ती पाहून निर्भर ! १
कविद्वय म्हणती, भवसागर हा । तरुनी जाऊ पार
सखा-सोयरा साईनाथ तो । आमुचा थोर आधार ! २
धन्य धन्य साई, जगी थोर....
ॐ शांती ऽ शांती ऽ ऽ शांती ऽ ऽ ऽ !
ॐ शुभं भवतु !
ॐ कर भला, हो भला ! !

# आरती श्री साईनाथ

* आरती ' श्री साईनाथा ' । चरणी ठेवूणी माथा
ओवाळू मनोभावे । ' साई ' हृदयी पहावे ॥ धृ० ॥

* बसला शिरडीशी । जग उद्धरण्याशी
तारक भक्तांचे । हाक मारिता नाचे ॥ आ० ॥ १

* ' अंतर्ज्ञानी ' जाणी चित्त । पुरवी भक्तांचे हेत
येई, धावुनी क्षणात । साक्षात्कार अनंत ! २

* जय जय ' श्री साईनाथा ' । गातो यशाची गाथा
शिरडीश्वरा आता । तूच सर्वांचा त्राता ३

* प्रसाद उदीचा आता । मिळतो शिरडीस जाता
बाबा, सर्वांचे होता । तुमची प्रार्थना करता ४

* आरती आम्ही करितो । सावंत राघव घ्यातो
जयजय श्री साईनाथा । आरती ओवाळू आता ५

कवी – शिवाजी सावंत
राघव शिवणीकर

REFBK-0025789
REFBK-0025789
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५८५
काव्य
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)